उपसंचालक आरोग्य सेवा, लातूर मंडळ, लातूर यांच्या अधिपत्या खालील उपजिल्हा रुग्णालय, कळंब, जि. लातूर येथील १५ नवनिर्मित अस्थाई पदे पुढे चालू ठेवणेबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः अपदे-२०१८/प्र.क्र.४५/आरोग्य-४,

१० वा मजला, संकुल इमारत,
गो.ते. रुग्णालय आवार, मुंबई-४०० ००१,
तारीखः १ मार्च, २०१८.

<u>वाचा</u>

१) **शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांकःपदनि-२०१५/प्र.क्र.२७२/आरोग्य-३, दि.०२.०१.२०१७.**

२) **सहसंचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांकः संआसे/कक्ष-३/टे-५अे/उजिरुकळंब/अपदे-१/सन २०१७-१८/९८२-८३/१८, दि.०१.०२.२०१८.**

<u>प्रस्तावना</u>

उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर मंडळ, लातूर यांच्या अधिपत्याखालील उपजिल्हा रुग्णालय कळंब, जि. उस्मानाबाद येथील नवनिर्मित १५ अस्थाई पदे दि.१.०६.२०१७ ते दि.२८.०२.२०१८ या कालावधीसाठी पुढे चालू ठेवण्याबाबतचा संदर्भाधीन क्र.२ येथील दि.१.०२.२०१८ च्या पत्रान्वये प्राप्त झालेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय</u>

उपसंचालक आरोग्य सेवा, लातूर मंडळ, लातूर यांच्या अधिपत्याखालील उपजिल्हा रुग्णालय कळंब, जि. उस्मानाबाद येथील १५ अस्थाई पदे (१) दि.०१.०६.२०१७ ते दि.३०.०९.२०१७, (२)दि.०१.१०.२०१७ ते दि.३१.१२.२०१७ आणि (३)दि.०१.०१.२०१८ ते दि.२८.०२.२०१८ या कालावधीसाठी पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर प्रस्तावावरील खर्च, मागणी क्रमांक.आर-१, मुख्य लेखाशीर्ष “२२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६-सार्वजनिक आरोग्य, ११० - संचालक प्रशासन, (०१) (०९) महाराष्ट्र आरोग्य सेवा विकास प्रकल्पातंर्गत ग्रामीण / कुटीर रुग्णालयांचे उपजिल्ह रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन (२२१० ४६२४)” या लेखाशीर्षाखालील सन २०१७-१८ च्या मंजूर अनुदानामधून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय, वित्त विभागाचा शासन निर्णय, क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.१०.०२.२०१७, शासन निर्णय, क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.०८/आ.पु.क., दि.०३.१०.२०१७ व शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.०८/आपुक, दि.०८.०१.२०१८ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२२८१३२९४८५६१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pradip M Balkavde

Digitally signed by Pradip M Balkavde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8db6aab31faca2f1a89698a28c94703436c07cda664672d20607766dc59d345b, cn=Pradip M Balkavde
Date: 2018.03.01 16:28:47 +05'30'

(प्र.मो.बलकवडे)
अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,
महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल-१/२, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर,
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई,
३. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई,
४. सहसंचालक, आरोग्य सेवा (रूग्णालये-राज्यस्तर), मुंबई,
५. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), पुणे.
६. सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (लेखा व लेखापरिक्षा), पुणे,
७. उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर मंडळ, लातूर,
८. जिल्हा शल्य चिकित्सक, लातूर,
९. जिल्हा कोषागार अधिकारी, लातूर,
१०.जिल्हा आरोग्य अधिकारी, लातूर,
११.वित्त विभाग (व्यय-१३, अर्थसंकल्प-१९), मंत्रालय, मुंबई,
१२.अवर सचिव (सेवा-२/ सेवा-३/ सेवा-५ /अर्थसंकल्प), सा.आ.वि., मंत्रालय, मुंबई,
१३. निवडनस्ती (आरोग्य- ४).